# राजभवन, मुंबई

**मलबार हिल, वाळकेश्वर रोड, मुंबई ४०० ०३५**
**दूरध्वनी क्रमांक (०२२) २३६३ २३ ४३.**

राज्यपालांचे सचिव कार्यालय व परिवार प्रबंधक कार्यालय, राजभवन मुंबई येथिल खालील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पदांसमोर नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व इतर अटी व शर्तीची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदनाम | एकूण पदे व समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा. व. | अराखिव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहायक | ३ (१ पद महिलासांठी) | १ | | | | | | | | २ |
| लघुटंकलेखक | १ | | | | | | | | | १ |
| लिपीक टंकलेखक | ४ (१ पद अंशकालीन कर्मचा-यांसाठी व १ पद मा.सैनिकांसाठी) | | | | | | | १ | | ३ |
| संदेशवाहक | ६ (४ पदे महिलासांठी, १ पद प्रकल्पग्रस्तांसाठी व १ पद मा.सैनिकांसाठी) | | १ | | १ | | | | ३ | १ |
| माळी | ५ (२ पदे प्रकल्पग्रस्तांसाठी व ३ पदे मा.सैनिकांसाठी) | | | | | १ | | | १ | ३ |
| सहायक (खादयपेय) | ४ (२ पदे महिला, १ पद प्रकल्पग्रस्त व १ पद मा.सैनिकांसाठी) | | | | | | | | २ | २ |
| प्लेट वॉशर | २ (मा.सैनिकांसाठी) | | १ | | | | | | | १ |
| कचरा मजदूर | २ (१ पद मा.सैनिकांसाठी) | | | | | | | | | २ |
| टेनिस बॉय | १ | | | | | | | | | १ |
| झिलाईगार | १ | | | | | | | | | १ |
| एकूण | २९ | १ | २ | | १ | १ | | १ | ६ | १७ |
| सफाईगार(स्वच्छक) | २ | आरक्षण लागू नाही | | | | | | | | |
| एकूण रिक्त पदे | ३१ | | | | | | | | | |

टिप :- १) वर नमुद केलेल्या पदांच्या संख्येत/आरक्षणात बदल होऊ शकतो. रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक / समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रीया अंशतः/ पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना राहतील.

२) वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज. (क), भ.ज.(ड) या वर्गवारीसाठी आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतर परिवर्तनीयतेच्या तरतुदीनुसार भरण्यात येतील.

३) रिक्त पदांमध्ये ३१ ऑगस्ट २०१४ अखेर रिक्त होणा-या काही पदांचाही समावेश करण्यात आला आहे, त्यामुळे पदांच्या उपलब्धतेनुसार निवड झालेल्या उमेद्वारांना नियुक्ती देण्यात येईल.

- **<u>शैक्षणिक पात्रता</u> - उमेदवाराने उपरोक्त पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता दि. ३१ डिसेंबर २०१३ रोजी धारण केली असलेली पाहिजे. पदनिहाय किमान शैक्षणिक पात्रता इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता/ अनुभव | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | **सहाय्यक (गट क)**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२४००) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी<br>२) इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० व मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिटाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण<br>३) **अनुभव** शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक संस्था /मंडळे किंवा खाजगी क्षेत्र या मधिल लिपीक वर्गीय / लेखा विषयक कामाचा कमीतकमी ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | टिपणीलेखन, पत्रव्यवहार, विविध संगणक प्रणालीचा वापर व इतर कार्यालयीन अनुषंगीक कामे |
| २. | **लघुटंकलेखक (गट क) (इंग्रजी)**<br>(वेतनबॅण्डरु.५२०० - २०२०० ग्रेड वेतन रु.२४००) | १) मान्यता प्राप्त माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण.<br>२) इंग्रजी लघु लेखनाचा वेग ८० शब्द प्रति मिनिट, इंग्रजी टंकलेखनाचे ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिटाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण | १) श्रुतलेखन (Dictation)<br>२)इतर लिपीकवर्गीय कामासह शासकीय पत्र व्यवहार व संगणकावर टंकलेखनाची अनुषंगीक कामे. |
| ३. | **लिपिक-टंकलेखक (गट क)**<br>(वेतनबॅण्डरु.५२०० - २०२०० ग्रेड वेतन रु.१९००) | १) मान्यता प्राप्त माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>२) इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट व मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिटाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण. | १) लिपीक वर्गीय कामे<br>२) संगणकावर शासकीय पत्रे टंकलिखीत करणे, विविध संगणक प्रणालीचा वापर करणे व इतर अनुषंगीक कामे |
| ४. | **संदेशवाहक (गट ड)**<br>(वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००) | १) किमान ४ थी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) दुचाकी वाहन परवानाधारकास प्राधान्य. | १) कार्यालयीन टपालाची व साहित्याची ने - आण करणे<br>२) शिपाईपदाची कामे |
| ५. | **माळी ( गट ड )**<br>(वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००) | १) कमीतकमी सातवी पास<br>२) एक वर्षाचा कृषी विद्यापीठाचा माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम / कृषी पदवीका<br>३) प्रत्यक्ष बागकामाचे ज्ञान व अनुभव | राजभवन आवारातील बगिचा व उद्यानातील झाडांची खतपाणी घालून निगा राखणे व नविन झाडांची लागवड करणे, सर्प व इतर प्राणीमित्र असल्यास प्राधान्य. |
| ६. | **सफाईगार (गट ड)**<br>(वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००) | १) किमान ४ थी परीक्षा उत्तीर्ण. | १)प्रसाधनगृहे/ स्वच्छतागृहांची साफसफाई करणे<br>२)राजभवन परीसराची साफसफाई करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | **सहाय्यक (गट ड) (खाद्यपेय विभाग)** (वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००) | मान्यताप्राप्त संस्थेचा, १) हॉस्पिटॅलिटी सर्विस मधील एक वर्षाचा प्रमाणपत्र पाठयक्रम किंवा पदवीका पाठयक्रम, किंवा २) हॉटेल मॅनेजमेंट मधील पदविका (One Year's Certificate or Diploma course in Hospitality Service OR Hotel Management from recognized institute) | राज्यपाल तसेच राजभवन येथील अतिथी व अधिकारी यांना खानपानविषयक अनुषंगीक सेवा पुरविणे |
| ८. | **प्लेट वॉशर (गट ड) (खाद्यपेय विभाग)** (वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००) | १) किमान ७ वी परीक्षा उत्तीर्ण | राजभवन मधिल खाद्यपेय विभागातील स्वयंपाकी यांना नाश्ता व जेवण बनविण्यासाठी मदत करणे व जेवणाची भांडी, प्लेटस् व स्वयंपाकघर स्वच्छ करणे.भव |
| ९. | **कचरा मजदूर (गट ड)** (वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००) | १) किमान ४ थी परीक्षा उत्तीर्ण. . | राजभवन परिसराची / कार्यालयाची साफसफाई /स्वच्छतेसंबधीची अनुषंगीक कामे |
| १०. | **टेनिस बॉय (गट ड)** (वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००) | १) किमान ७ वी परीक्षा उत्तीर्ण. २) खेळाकडे कल असल्याचे सिध्द करणे आवश्यक (who have proven aptitude for sports) (किमान शाळास्तरावर/ जिल्हास्तरावरील खेळाचे प्रमाणपत्र धारक असणा-यांना प्राधान्य) | राज्यपाल/प्रमुख अतिथी/अधिकारी यांच्या टेनिस व इतर खेळाच्यावेळी अनुषंगीक सेवा पुरविणे. |
| ११. | **झिलईकार (गट ड) (पॉलिशर)** (वेतनबॅण्ड रु.४४४० - ७४४० ग्रेड वेतन रु.१६००) | १) किमान ७ वी परीक्षा उत्तीर्ण. २) झिलाईकामाचे (Furniture Polishing) पुरेसे व्यावहारिक ज्ञान आणि अनुभव | १) राजभवन मधिल फर्नीचर पॉलीश करणे, देखभाल करणे |

**टिप -** शासन निर्णय क्रमांक निवक १०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६ अ, दि.६.१०.२०१० अन्वये प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या घटकातील उमेद्वारांना जर त्यांना लिपीक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येईल.

- **वयोमर्यादा :-** उमेद्वाराचे वय दि. ३१-१२-२०१३ रोजी किमान १८ वर्षे व ३३ वर्षे पेक्षा जास्त नसावे.

१) **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम:-**

अ) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीयांकरिता ३८ वर्षापर्यंत.

ब) माजी सैनिक व अपंग उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.

क) पात्र खेळाडूंच्या उमेद्वारांकरीता वयाची अट ५ वर्षे शिथिल राहील.

ड) पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेद्वारांच्याबाबतीत ४६ वर्षे

- **निवडीची पध्दत :-**

१) वरीलपैकी **सहाय्यक व लिपीक टंकलेखक पदांसाठी मौखिक व व्यावसायीक चाचणी घेण्यात येणार नाही फक्त लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे निवड यादी तयार करण्यात येईल.** सदर पदांसाठी परिक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.

२) सहाय्यक व लिपीक टंकलेखक पदांव्यतिरिक्त पदांसाठी जे उमेद्वार लेखी परिक्षेत किमा ४५ % टक्के गुण प्राप्त करतील अशा उमेद्वारांचीच व्यावसायिक चाचणी / शारीरिक क्षमता चाचणी व तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

३) पदानुसार लेखी परीक्षा, व्यावसायिक चाचणी, मुलाखतीचे गुण एकत्रित करुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

३.१) <u>सहाय्यक व लिपीक पदासाठी (गट-क)</u>

| पदनाम | विषय | माध्यम | दर्जा | लेखी परीक्षा एकूण गुण | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| • सहाय्यक | मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन आणि अंकगणित | इंग्रजी विषयाकरिता इंग्रजी, इतर विषयांकरिता मराठी | पदवी | २०० | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| • लिपीक टंकलेखक | मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन आणि अंकगणित | इंग्रजी विषयाकरिता इंग्रजी, इतर विषयांकरिता मराठी | एस.एस.सी | २०० | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

- सहाय्यक व लिपीक टंकलेखक पदांव्यतिरिक्त इतर पदांसाठी लेखी परीक्षा, व्यावसायिक चाचणी व मुलाखत घेण्यात येईल, त्याचे स्वरुप पदनिहाय खालीलप्रमाणे असेल.

३.२) <u>लघुटंकलेखक पदासाठी</u>

| विषय | माध्यम | दर्जा | लेखी परीक्षा एकूण गुण | व्यावसायिक चाचणी एकूण गुण | मुलाखत एकूण गुण | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन आणि अंकगणित | इंग्रजी विषयाकरिता, इंग्रजी वगळता इतर विषयांकरिता मराठी | एस.एस.सी | १०० | ८० | २० | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

३.३) संदेशवाहक / कचरा मजदूर / सफाईगार या पदांसाठी

| विषय | माध्यम | दर्जा | लेखी परीक्षा एकूण गुण | व्यावसायिक चाचणी एकूण गुण | मुलाखत एकूण गुण | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन आणि अंकगणित | मराठी | चौथी समान | ५० | ४० | १० | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

३.४) माळी पदासाठी

| विषय | माध्यम | दर्जा | लेखी परीक्षा एकूण गुण | व्यावसायिक चाचणी एकूण गुण | मुलाखत एकूण गुण | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन आणि अंकगणित | मराठी | सातवी समान तसेच कृषी विद्यापीठाचा माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम / कृषी पदवीका | १०० | ८० | २० | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

३.५) प्लेट वॉशर / टेनिसबॉय / झिलईगार या पदांसाठी

| विषय | माध्यम | दर्जा | लेखी परीक्षा एकूण गुण | व्यावसायिक चाचणी एकूण गुण | मुलाखत एकूण गुण | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन आणि अंकगणित | मराठी | सातवी समान | १०० | ८० | २० | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

३.६) सहायक - ( खाद्यपेय विभाग ) (गट-ड) पदासाठी

| विषय | माध्यम | दर्जा | लेखी परीक्षा एकूण गुण | व्यावसायिक चाचणी एकूण गुण | मुलाखत एकूण गुण | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन आणि अंकगणित | मराठी | हॉस्पिटॅलिटी सर्विस मधील एक वर्षाचा प्रमाणपत्र पाठयक्रम किंवा पदवी पाठयक्रम किंवा मान्यताप्राप्त संस्थेमधून हॉटेल मॅनेजमेंट मधील पदविका | १०० | ८० | २० | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

- **सर्वसाधारण अटी व शर्ती**

१) उमेद्वार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवाराने सक्षम अधिका-याचे रहिवाशी / डोमिसाइल प्रमाणपत्र अथवा अधिवास प्रमाणपत्र सादर करावे. उमेदवाराचा जन्म महाराष्ट् राज्यात झाला असल्यास जन्माचा / शाळा सोडल्याचा दाखला कागदपत्रांच्या तपासणीचे वेळी सादर करावा.

२) उमेद्वारास किमान मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

- मागासवर्गीयांकरीता असलेले आरक्षण हे केवळ महाराष्ट्रातील सक्षम अधिका-यांनी दिलेले मागासवर्गीय जातीचे प्रमाणपत्र धारण करीत असलेल्या उमेदवारांसाठी मर्यादीत राहील.

- मागासवर्गीय उमेदवारांनी नजीकचे कालावधीतील सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. जात वैधता प्रमाणपत्र उपलबध असल्यास कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करावे. निवड होणा-या अनु. जमातीच्या उमेदवारांव्यतीरिक्त इतर सर्व मागासवर्गीय घटकातील उमेदवारांना शासन निर्णय, सा.प्र.विभाग क्र. बीसीसी-२०११/ प्र.क्र./१०६४/२०११/ १६ ब, दि.१२ डिसेंबर २०११ अन्वये सबंधित उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र / शपथपत्र लिहून दिल्यानंतर विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, शासन निर्णयाच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती दिली जाईल, विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची सेवा संपुष्टात आणण्यासंदर्भात येऊन शासनाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

५) भुकंप / प्रकल्पग्रस्त उमेद्वारांचे बाबतीत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले व त्यामध्ये उमेदवाराचे नाव नमूद केलेले प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

६) माजी सैनिक उमेद्वार हा, शासन परिपत्रक सा.प्र.विभाग क्र.१०.१०.१९८० व दि.१६.४.१९८१ नुसार माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरिता पात्र उमेद्वार असावा. तसेच या आरक्षणामधून लाभ घेतलेले उमेदवार पुन्हा या समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र ठरणार नाहीत.

७) अंशकालीन कर्मचा-यांना त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणी क्रमांकाचा उल्लेख करावा. पदवीधारक / पदविकाधारक अंशकालीन उमेद्वारांनी शासन निर्णय, दि.२६.८.२००५ व २७.१०.२००९ मधील तरतुदीनुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र अंतिम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

तसेच अंशकालीन उमेद्वारांनी एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला आहे, त्यांना पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

८) खेळाडूंनी शासन निर्णय, दिनांक ३०.४.२००५ व तद्नंतर सुधारीत निर्णयानुसार गट क साठी क्रिडाविषयक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र संचालक क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट् राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेले असावेत, ते प्रमाणपत्र विधिग्राहय नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

९) कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल झाल्यास किंवा भरती प्रकीया रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणाताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदाची संख्या, समांतर आरक्षणाबाबत बदल करणे, परिक्षेला स्थगीत करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवलेले आहेत.

१०) सध्या शासकीय/ निमशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या पात्र उमेदवारांनी त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने अर्ज (ऑनलाईन) करावेत व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करावे.

११) अनुभवाच्याबाबत नियतकालिक, अर्धवेळ, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन, तसेच प्रभारी म्हणून केलेल्या नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी इ. अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

१२) खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता ३३ टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी तसेच भ.ज. (क/ड), विमाप्र आणि इ.मा.व. प्रवर्गातील उमेदवारांना उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट (नॉन क्रिमीलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे दि.३१ मार्च २०१४ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१३) सहाय्यक, लघुटंकलेखक व लिपिक टंकलेखक पदासाठी संगणक ज्ञान प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. ते नसल्यास नियुक्तीनंतर २ वर्षाच्या आत असे प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य राहील, अन्यथा सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच या संदर्भात शासनातर्फे वेळोवेळी निर्गमित केलेले अन्य आदेश लागू राहतील.

१४) सहाय्यक, लघुटंकलेखक व लिपिक टंकलेखक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, त्या परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१५) लेखी परीक्षेमध्ये पात्र ठरलेला उमेदवार व्यावसायिक चाचणीसाठी किंवा मुलाखीसाठी गैरहजर असल्यास त्यास भरती प्रक्रियेतील सर्व बाबींसाठी गैरहजर समजून त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.

१६) अंशकालीन उमेदवारांकरिता जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षित असलेल्या पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे गुणवत्तेनुसार उपलब्ध अन्य उमेदवारांमधून विहित नियमानुसार भरण्यात येतील.

१७) माळी पदासाठी निवड करतांना विहीत अर्हताधारक उमेद्वारांमधून सर्पमित्रास (सर्प पकडण्याचे कौशल्य असलेला) तसेच इतर प्राणीमित्रास प्राधान्य देण्यात येईल, त्यासंबधीचे प्रमाणपत्र असल्यास मुलाखतीचे वेळेस सादर करणे आवश्यक.

१८) विवाहित असल्यास लहान कुटुंब (दोन पेक्षा जास्त मुले नसल्याचे) विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. (नमुना सोबत जोडला आहे)

१९) निवड झालेल्या उमेदवारांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू राहील.

२०) निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा विहीत केलेल्या भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२१) समकक्ष पद धारण करणा-या वर्ग ड मधिल कर्मचा-यांना कार्यालय प्रमुखांच्या निर्देशानुसार वेळप्रसंगी अन्य पदाची कामे करणे बंधनकारक राहील.

२२) राज्यपालांचे परिवार प्रबंधक कार्यालयातील वर्ग ड मधिल पदावर नियुक्त होणा-या कर्मचा-याची आवश्यकतेनुसार भविष्यात राजभवन, मुंबई व्यतिरिक्त राजभवन, पुणे व नागपूर येथे प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना होऊ शकते.

२३) निवड झालेल्या उमेद्वारांना राजभवन येथे निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास तेथे वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

२४) उमेद्वाराने अर्जात नमूद केलेली माहिती व सादर केलेली कागदपत्रे खोटी आढळल्यास व खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेद्वाराची उमेद्वारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२५) लेखी परीक्षा / मुलाखतीस उमेदवारांनी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

२६) अपंग उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी नियमानुसार वाढीव वेळ देण्यात येईल, तसेच आवश्यकता असल्यास लेखनिकाची मदत कार्यालयामार्फत पुरविण्यात येईल, त्यासाठी त्यांनी परिक्षेच्या किमान सात दिवस आधी तसे कार्यालयाला लेखी कळविणे आवश्यक आहे.

**२७) उमेद्वारांची लेखी परिक्षा अर्जदाराच्या अर्हतेसबंधीची कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचा कोणताही हक्क असणार नाही. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतरच पात्र उमेद्वारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षणनिहाय निवड अंतिम केली जाईल.**

२८) गुणानुक्रमे लेखी परिक्षेत उत्तीर्ण होऊन निवड झालेल्या उमेदवारांनी खालीलप्रमाणे आवश्यक दस्तऐवज कागदपत्रांच्या तपासणीचेवेळी सादर करावेत :-

१) ऑनलाईन अर्जाची प्रत तसेच परीक्षा शुल्क भरलेल्या चलनाची प्रत

२) आवश्यक त्या शैक्षणिक अर्हतेसंबधीची मूळ प्रमाणपत्रे

३) वयासंबधी दाखला (जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला)

४) संगणक अर्हता परिक्षा उत्तिर्ण प्रमाणपत्र (असल्यास)

५) जातीचे प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र

६) अधिवास प्रमाणपत्र

७) इतर मागासवर्गीय/खुल्या प्रवर्गातील महिला/ विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांनी दि. ३१ मार्च २०१४ पर्यंत वैध असलेले व सक्षम अधिका-यांनी दिलेले नॉन क्रिमीलेअर (उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे) प्रमाणपत्र

८) शासकीय/ निमशासकीय कर्मचा-यांच्याबाबतीत सक्षम अधिका-यांचे संमतीपत्र

९) शासन परिपत्रक , सा.प्र.विभाग क्र१००५/ प्र.क्र.३६ /०५/१६ अ, दि.२६.५.२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञाप्रत्र, अविवाहित उमेदवारांनी ″ लागू नाही ″ असे नमूद करुन सदर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०) समांतर आरक्षण अंतर्गत लाभ घेणा-या उमेदवारांनी शासनाने ठरवून दिलेल्या पात्रतेबाबतची आवश्यक प्रमाणपत्रे

११) अनुभवाची अट असलेल्या पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी अनुभवाचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र

१२) पदविधारक / पदविकाधारक अंशकालीन उमेद्वारांनी शासन निर्णय , दि.२६.८.२००५ व २७. १०.२००९ मधील तरतुदीनुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र

- **ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना** :- वर नमूद पदनिहाय शैक्षणिक पात्रता, संबधीत अटी शर्तीची पूर्तता करणारे उमेद्वार सर्वसाधारण सूचना विचारात घेऊन खालीलप्रमाणे ऑनलाईन अर्ज करु शकतात.

१) ऑनलाईन पध्दतीने अर्ज **www.exxononline.net/rajbhavan** या संकेतस्थावर उपलब्ध असतील.

२) अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये.

३) अर्जाची नोंदणी झाल्यानंतर उमेद्वाराने अर्ज क्रमांक (Application form Number ) व पासवर्ड (Password) काळजीपूर्वक स्वतःकडे पुढील प्रक्रीयेसाठी जपून ठेवावा.

४) विहित पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर परिक्षा शुल्क भरण्यापासून सूट असणा-या अर्जदारांव्यतिरिक्त इतर सर्व अर्जदारांनी परीक्षा शुल्क भरल्याशिवाय त्यांचे अर्ज वैध ठरणार नाही.

५) उमेद्वाराने यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवायोजन कार्यालयाकडे / एकात्मीक आदिवासी प्रकल्प कार्यालय / जिल्हा सैनिक कार्यालय येथे नोंदविले असेल तरी त्यांनी या पदांच्या भरतीसाठी स्वतंत्र ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

६) उमेद्वाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून ती स्वतःजवळ ठेवावी व कागदपत्रांच्या तपासणीचेवेळी सादर करावा.

७)उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर अर्जाची स्थिती, लेखी परिक्षेचे वेळापत्रक, लेखी परिक्षेसाठी प्रवशेपत्र व इतर अनुषंगीक सर्व सूचना **www.exxononline.net/rajbhavan** या वेबसाईटवर देण्यात येतील. ऑनलाईनवर प्राप्त झालेल्या लेखी परिक्षेसाठीच्या प्रवेशपत्राची प्रत व अलीकडील पासपोर्ट आकाराच्या उमेद्वाराचे दोन फोटो लेखी परिक्षेच्यावेळी आणणे आवश्यक आहे त्याशिवाय लेखी परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

८) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वतःचा मोबाईल क्रमांक व ई - मेल आयडी(असल्यास) नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा

९) **विशेष सूचना :-** एका पदांपेक्षा जास्त पदांसाठी उमेदवार अर्ज करु शकतात परंतु प्रत्येक पदासाठी स्वतंत्र ऑनलाईन अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करणे व प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र आवेदन शुल्क भरणे आवश्यक आहे. तसेच एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करु इच्छिणा-या उमेद्वारांनी सर्व पदांसाठीच्या लेखी परिक्षेचे आयोजन एकाच दिवशी दोन सत्रांमध्ये खालीलप्रमाणे करण्यात येण्याची शक्यता आहे ही बाब, एकाच सत्रातील एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करतांना उमेद्वाराने लेखी परिक्षेस उपस्थितीच्या दृष्टीने विचारात घ्यावी. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

सत्र पहिले (सकाळी):- १) लघुटंकलेखक, लिपीक टंकलेखक, संदेशवाहक, कचरा मजदूर, सफाईगार या पदांसाठी लेखी परिक्षा

सत्र दुसरे (दुपारी): - १) सहाय्यक,माळी, सहाय्यक (खाद्यपेय), प्लेट वॉशर, टेनिसबॉय, झिलईकार, या पदांसाठी लेखी परिक्षा

- **आवेदन शुल्क भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना :-**

१) आवेदन शुल्क (फी) - खुल्या संवर्गातील उमेदवारांना रु.३००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.१५०/-
( **माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.)**

२) ऑनलाईन अर्जाची नोंदणी झाल्यानंतर सदर संकेतस्थळावर आवेदन शुल्क भरण्यासाठी चलन उपलब्ध होईल व ते प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर नमूद केलेले शुल्क, केवळ **स्टेट बँक ऑफ इंडिया** ( SBI ) या बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये दि.२९जानेवारी २०१४ पर्यंत भरावे.

- **अर्ज व आवेदन शुल्क भरण्याचा कालावधी खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | बाब | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | **९ जानेवारी २०१४** | **२७ जानेवारी २०१४** |
| २ | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखांमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | **११ जनेवारी २०१४** | **२९ जनेवारी २०१४** |

- परिक्षेचे प्रवेशपत्र उमेद्वारांस पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाहीत ते www.exxononline.net/rajbhavan या संकेतस्थळावरच उपलब्ध करुन देण्यात येईल.

- **अर्जदाराचा फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे** - अर्जदाराने आपला अलीकडील फोटो व स्वतःची स्वाक्षरी वेबसाईटवर दिलेल्या सूचनेनुसार ऑनलाईन अर्ज करतांना अपलोड करावा.

- उमेद्वारांच्या माहिती व मदतीकरीता भ्रमणध्वनीच्या (Mobile No.) 9769449644 या क्रमांकावर योग्य ते मार्गदर्शन प्राप्त होईल.

- निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.
- सदर निवड प्रक्रिया कोणत्याही कारणास्तव स्थगित, रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी राखून ठेवले आहेत.

(विकास चंद्र रस्तोगी)
*भाप्रसे*
राज्यपालाचे सचिव

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ**
**(विवाहित उमेदवारांसाठी)**

मी, श्री. / श्रीमती ---------------------------------- श्री. --------------

--------------- यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय ------- वर्षे, राहणार --------

---------------------------------- याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी —————————— या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ———— (संख्या) इतके हयात मुले आहेत. त्यापैकी दि. २८-०३-२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दि. २८-०३-२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

( ) लागू नाही.

अर्जदाराची सही

तारीख :-
ठिकाण :-